राज्य पोलीस दलातील ४५ वर्ष व त्यापेक्षा अधिक वयाच्या पोलीस कर्मचारी व अधिकारी यांच्या वैद्यकीय तपासण्या पोलीस सर्वचिकित्सालय *(polyclinic)* येथे करण्यास मान्यता देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
गृह विभाग
शासन निर्णय क्रमांक पोकुआ-०६१७/प्र.क्र.३४८/दोन/पोल-७.

मंत्रालय, दुसरा मजला, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०००३२.

दिनांक २२ फेब्रुवारी २०१८.

वाचा :-
1) शासन निर्णय, गृह विभाग, क्रमांक पोकुआ-०६१७/प्र.क्र.३४८/पोल-७, दिनांक २७.०६.२०१७.
2) शासन पत्र, गृह विभाग, क्रमांक पोकुआ-०६१७/प्र.क्र.३४८/पोल-७, दिनांक ११.१०.२०१७.
3) पोलीस आयुक्त, नागपूर शहर, यांचे पत्र क्रमांक पोआना/मा.स.वि/पॉ.क्लि./२०१८-६१, दिनांक १८.०१.२०१८.
4) शासन निर्णय, गृह विभाग, क्रमांक पोकुआ-०६१७/ प्र.क्र.३४८/ एक/ पोल-७, दिनांक २२.०२.२०१८.

प्रस्तावना.-

दिनांक १ जुलै २०१७ ते ३० सप्टेंबर २०१७ या कालावधीत, राज्य पोलीस दलातील ४५ वर्ष व त्यापेक्षा अधिक वयाच्या पोलीस कर्मचारी व अधिकारी *(भारतीय पोलीस सेवेतील अधिकारी वगळून)* यांच्या एकूण ११ विवक्षित वैद्यकीय तपासण्या शासकीय रुग्णालयांमधून करण्यास, शासन निर्णय, गृह विभाग, क्रमांक पोकुआ-०६१७/प्र.क्र.३४८/पोल-७, दिनांक २७.०६.२०१७, व्दारे मान्यता देण्यात आली होती.

२. शासन निर्णय, गृह विभाग, क्रमांक पोकुआ-०६१७/ प्र.क्र.३४८/ एक/ पोल-७, दिनांक २२.०२.२०१८, व्दारे उक्त तपासण्या करुन घेण्यासाठी दिनांक १ ऑक्टोबर २०१७ पासून ते ३१ मार्च २०१८ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.

३. आता, उक्त तपासण्या ह्या नागपूर शहरातील शासकीय रुग्णालयांबरोबरच पोलीस आयुक्तालय, नागपूर शहर, यांच्या अधिकारक्षेत्रातील पोलीस मुख्यालय येथील पोलीस रुग्णालयातील पोलीस सर्वचिकित्सालय *(polyclinic)* येथून करुन घेणेबाबतचा प्रस्ताव पोलीस आयुक्त, नागपूर शहर, यांनी शासनास सादर केला आहे.

४. त्या अनुसार, शासनाने पुढील निर्णय घेतला आहे.

शासन निर्णय.-

शासन निर्णय, गृह विभाग, क्रमांक *पोकुआ-०६१७/ प्र.क्र.३४८/ पोल-७*, दिनांक २७.०६.२०१७ आणि शासन निर्णय, गृह विभाग, क्रमांक *पोकुआ-०६१७/ प्र.क्र.३४८/एक/ पोल-७*, दिनांक २२.०२.२०१८, अनुसार, राज्य पोलीस दलातील ४५ वर्ष व त्यापेक्षा अधिक

वयाच्या पोलीस कर्मचारी व अधिकारी *(भारतीय पोलीस सेवेतील अधिकारी वगळून)* यांच्या वैद्यकीय तपासण्या ह्या पोलीस आयुक्तालय, नागपूर शहर, यांच्या अधिकारक्षेत्रातील पोलीस मुख्यालय येथील पोलीस रुग्णालयातील पोलीस सर्वचिकित्सालय *(polyclinic)* येथून करुन घेण्यास, याव्दारे, मान्यता देण्यात येत आहे.

२. तसेच, पोलीस रुग्णालयातील पोलीस सर्वचिकित्सालय *(polyclinic)* यांना उक्त तपासण्यांचे शुल्क म्हणून प्रति व्यक्ती अधिकतम रु.५००/- इतकी रक्कम प्रदान करण्यास, याव्दारे, मान्यता देण्यात येत आहे.

३. उक्त खर्च हा पोलीस कर्मचारी/ अधिकारी यांच्या वैद्यकीय खर्चासाठी चालू (सन २०१७-१८) वित्तीय वर्षात उपलब्ध असलेल्या निधीतून भागविण्यात यावा.

४. हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१८०२२२१४५४२२५१२९ असा आहे. हा शासन निर्णय डीजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Swapnil Gopal Borse

Digitally signed by Swapnil Gopal Borse
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Home Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=66835707253ff77ef0e333eb3ad582f9b876d443b2654088832e43dcad21c52a, cn=Swapnil Gopal Borse
Date: 2018.02.22 14:54:52 +05'30'

(स्वप्नील गोपाल बोरसे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन.

प्रति,

१) मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई.
२) मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
३) मा. विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानसभा/ विधानपरिषद, यांचे खाजगी सचिव, विधान भवन, मुंबई.
४) मा. राज्यमंत्री (गृह-शहरे) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
५) मा. राज्यमंत्री, गृह (ग्रामीण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
६) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
७) पोलीस आयुक्त, नागपूर शहर, नागपूर.
८) संचालक, आरोग्य सेवा, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
९) संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रतः-

१) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ मर्यादित, मुंबई.
२) महासंचालक, माहिती व जनसंपर्क, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई.
३) जिल्हा कोषागार अधिकारी, नागपूर.
४) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)- २, महाराष्ट्र, नागपूर.
५) निवड फाईल, पोल-७.